ISSN-2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Issues– I (a) Jan – Feb, 2025

OPEN ACCESS Original Research Article

# मराठवाड्यातील दारिद्र्यरेषेखालील समाजजीवनाची सद्य :स्थिती - एक शोध

* डॉ. सागर शरद कुलकर्णी

* वाणिज्य विभाग, स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालय, अंबाजोगाई.

मराठवाडा असे नाव उच्चारताच दुष्काळ, गारपीट, अतिवृष्टी, औद्योगीक मागासलेपणा, औद्योगीक आजारपण, गरीबी, प्रचंड विषमता, बेकारी अशी अनेक संकटाच्या मालिकांची श्रृंखलाच आपल्यासमोर येते. मराठवड्यात मानव विकास निर्देशांक हा राज्य सरासरी (0.58 %) पेक्षा कमी आहे नैसर्गिक साधनसंपत्तीतही मराठवाडा फारसा संपन्न नाही. पायाभूत सुविधा, उद्योजकता, मनुष्यबळ याबाबतही मराठवाडा मागेच आहे. मराठवाड्यातील 85 % शेती ही कोरडवाहू पध्दतीने केली जाते. पिकांची उत्पादकताही कमीच असलेली दिसून येते. मराठवाड्याच्या आर्थिक विकासाचा विचार करताना मुख्यत: दारिद्र्याची समस्या भेडसावताना दिसते. मराठवाड्याच्या आर्थिक विकासाला खीळ घालणाऱ्या अनेक समस्यांची तीव्रता दिवसेंदिवस वाढत जाताना आपल्याला दिसत आहे. पराकोटीची प्रादेशिक विषमता, गरीबी, कुपोषण, प्रचंड बेकारी, व्यसनाधीनता, सार्वजनीक सुविधांचा अभाव, विकासाचा असमतोल, आर्थिक मंदीचे सावट, प्रदूषण, निरक्षरता, निकृष्ट दर्जाचे शिक्षण, आरोग्याचे समस्या, जीवनमानाच्या समस्या, सामाजिक अन्याय, शोषण, टोकाच्या जातीय अस्मिता, हिंसाचार, झुंडशाही, स्वायत्त संस्थांचा ऱ्हास, सांस्कृतिक मागासलेपण, अशा जटील समस्यांचा मराठवाड्यात सध्या विस्फोट झाला आहे. औद्योगीकीकरणाचा अभाव, तंत्रज्ञानाचा अभाव, अपुरे भांडवल इत्यादीमुळे अनेक लोकांना रोजगार मिळत नाही. त्यामुळे सुशिक्षीत लोकांना दारिद्र्यात दिवस काढावे लागतात. लोकांची अर्थाजनाची असमर्थता वाढीस लागते व यालयाच दारिद्र्य असे म्हणतात. मराठवाड्याचा विचार करताना अत्यंत विदारक चित्र आपल्याला पहायला मिळते.

**Copyright © 2025 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

प्रस्तुत लेखामध्ये मराठवाड्यातील दारिद्र्यरेषेखालील समाजजीवनाची परिस्थितीचा आढावा घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. प्राचीन काळापासूनच द्रारिद्र्यरेषेखालील लोक अभावाचे जगणे जगताना आढळतात. मराठवाड्यातील हा समाजाचा स्तर सुखापेक्षा दु:खाच्याच अनुभूतीचे पोळलेला आहे. बिकट आर्थिक परिस्थितीमुळे दैनंदिन जीवन असहाय्य झालेला हा समाज मराठवाड्यातही आहे. अशा समाजाच्या उध्दारणीसाठी

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Issues– I (a) Jan – Feb, 2025

OPEN ACCESS Original Research Article

प्रत्येकच सरकार प्रयत्न करत आहेत पण ते कधीच पुरेसे ठरलेले नाहीत. म्हणून मराठवाड्याचे दारिद्रय हे सर्वचकाळात कायमच राहिलेले आहे. विविध योजना, पोकळ आश्वासने, रोजगाराची हमी देवून दारिद्रय रेषेखालील समाजजीवन सुसह्य करण्याचे अनेक प्रयत्न केले जातात. पण हे प्रयत्न पूर्णांशाने सर्वत्र पोंहचत नाहीत. त्यामुळे असे प्रयत्न कागदोपत्रीच राहतात. उदा: रोजगार हमी योजना हा शासकीय प्रकल्प हा अशा एका प्रयत्नांपैकी दुबळा प्रयत्न आहे. मराठवाड्यात मागच्या 10 वर्षात बेरोजगारांच्या संख्येत कोणत्याही प्रकारची घट झाल्याचे दिसून येत नाही. शिक्षण, कुपोषण या विषयांवर मराठवाड्यात केवळ घोषणाच केल्या जातात. पण त्यात सुधारणा घडून येतना दिसत नाही. ज्यांना लाभ मिळायला हवा त्यांना तो मिळताना दिसत नाही. मराठवाड्यातील अनेक सेवाभावी संस्था, दानशूर व्यक्ती, लोकप्रतिनिधी यांच्या विचारविनिमयातून अशा समाजाला अधिकाधिक उन्नत करण्यासाठी प्रयत्न केले जातात. मात्र हे प्रयत्न अपूरे ठरताना दिसतात. अशावेळी सामाजिक बांधीलकी मांडणारा समाज अत्यवस्थ होतो व या दारिद्रय रेषेखालील समाजाला न्याय देण्यासाठी अनेक मार्गांचा अवलंब केला जातो. यातून या समाजजीवनाची अवनती तरी होतेय किंवा न्याय मिळाल्याचा अभास तरी निर्माण होतो. कारण संप, बंड, प्रतिमोर्चे, जाळपोळ, लूटालूट, दंगली हे मार्ग दारिद्रय रेषेखालील समाजाला उन्नत करण्याचे मार्ग नाहीत हे निश्चितच.

मराठवाड्यातील या सामाजिक स्तरा व्यतीरीक्त इतर स्तर अत्यंत संकुचित विचाराने, मनाने याकडे बघतात. सुखवस्तु स्तरातील व्यक्तींना या समाजाची परिस्थिती माहिती नाही असे नाही मात्र त्यासाठी ठोसपणे कार्य करण्याची यावर्गात दानतच मराठवाड्यात नाही. पांढरपेशा स्तरातील लोक ही स्वत:पुरतीच पाहणारी आहेत. यामध्ये सुख मानणारे व इतरांच्या सुखदु:खाची तमा न बाळगणारेच जास्त आहेत. मुख्य म्हणजे मराठवाड्यातील दारिद्रयरेषेखालील समाजजीवन संघटीत नाही. एकत्र सामूहीक आर्थिक उन्नतीचा विचारही इथे होत नाही. म्हणूनच केवळ दारिद्र्याचे प्रमाण मोजण्यापलीकडे शासनाने फारसे यात काही कलेले दिसत नाही. हीच तर मराठवाड्याची शोकांतीका आहे. अनेक संपन्न राज्यातसुध्दा या गोष्टीला अपवाद नाही. सध्याच्या महागाईच्या तीव्र झळा हातावरचं पोट असणाऱ्या लोकांना त्याची दाहकता जेवढी अधिक आहे तेवढी इतर लोकांना ती नाही हे खरे.

मराठवाड्यातील दृश्य अदृश्य स्वरुपाची बेरोजगारीस इथली दारिद्रय रेषेखालच्या लोकांची भयावह स्थिती कारणीभूत आहे. प्रथमत: शिक्षणाचा अभाव, गरीबी, संकुचित विचार किंवा या समाजस्तराचा अल्पसंतुष्टपणा याचा परिणाम मराठवाड्याच्या रोजगारावर होतोय.

मराठवाड्यात आजपर्यंत गरीब,अडाणी लोकांचा उपयोग केवळ मतांच्या राजकारणासाठी केलेला आहे. सत्तेतून पैसा व पैशातून सत्ता हे धोरण मराठवाड्यात अवलंबले जात असून याचा परीणाम विषमतेत वाढ होताना दिसते. मराठवाड्यातील दारिद्रयरेषेखालील लोकांचे जीवन अत्यंत हलाखीचे तर आहेच पण भविष्यात तरी यात सुधारणा होणे गरजेचे आहे. यासाठी ठोस उपाययोजना करणे महत्वाचे ठरणार आहे. मराठवाड्याचे दरडोई उत्पन्न अतिशय कमी असल्याने गरीब लोकांचे प्रमाण इथे खुप जास्त आहे. शिवाय

आर्थिक व सामाजिक मागासलेपणामुळे दारिद्र्य निर्मूलनाच्या कार्यक्रमाची परीणामकारकताही तुलनेने कमी आहे. म्हणून गरीबी कमी होण्याचा जो दर देशात येईल तो मराठवाड्यात साध्य करणे सहज शक्य होणार नाही. मराठवाड्यातील ग्रामीण विकासाच्या आड येणारी मुख्य बाब म्हणजे जनतेचे दारिद्रय ही आहे. हे निश्चितच खरे आहे. ग्रामीण भागातील दारिद्रय व ग्रामीण विकास या दोन्ही परस्परांशी निगडीत बाबी आहेत. मराठवाड्यात ग्रामीण जनतेच्या आर्थिक स्थितीत सुधारणा घडवणे आवश्यक आहे. त्यासाठी रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देणे, शेतीची, सिंचनाची व्यवस्था सुधारणा करणे गरजेचे आहे.

ग्रामीण मराठवाड्यात उद्योगांची वाढ होणे गरजेचे आहे तरुणांना स्वावलंबी बनवणे गरजेचे आहे. तसेच ग्रामीण मराठवाड्यात निरनिराळ्या सुविधा उपलब्ध करुन देणे इत्यादी गोष्टींवर भर देणे गरजेचे आहे. केवळ योजनेच्या घोषणा करुन भागणार नाही तर प्रभावी अमलबजावणी होणेही अगत्याचे आहे.

एकूणच काय तर ज्यांच्या हातात आपण मराठवाड्याच्या दोऱ्या सोपवल्या आहेत त्यांना वास्तवाशी काहीच देणे घेणे नाही असेच दिसते. आपल्याकडे सर्व समावेशक आणि मराठवाड्याच्या संतुलित विकासच्या निव्वळ गोष्टी करण्यात येतात. पण त्यादिशेने सक्षम, परिणामकारक प्रयत्न होत नाहीत. यासाठीच मराठवाडा जनता विकास परिषद नक्कीच या लोकांच्या अपेक्षा जाणून घेईल. शिक्षणाने सर्व संकटावर मात करता येईल, बदल घडवून आणता येईल.

**संदर्भ ग्रंथ:**

१.वित्तार्थ- डॉ. रूपा रेगे डायमंड पब्लिक
२. मिळून साऱ्याजणी मासिक
३.लोकसत्ता अर्थभान सदर
४. मौज दिवाळी अंक
५. अर्थसंवाद मासिक

*Cite This Article:*

*डॉ. कुलकर्णी सा. श. (2025).* **मराठवाड्यातील दारिद्र्यरेषेखालील समाजजीवनाची सद्य :स्थिती - एक शोध** . In Aarhat Multidisciplinary International Education Research Journal: Vol. XIV (Number I, pp. 45–47).
Doi: https://doi.org/10.5281/zenodo.16442848